# ३. राष्ट्रीय कृषि विकास योजना

**योजनेचे उदेश** :-- अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीतील शेतक-यांना उत्पन्न वाढवुन त्यांचे जीवनमान उंचवण्यासाठी शेतीविषयक बाबींचे १०० टक्के अनुदानावर खालील विविध बाबींचा लाभ देवुन लाभार्थींचा आर्थिक स्तर उंचावणे.

**लाभाचे स्वरुप** :--

| अ.क्र. | बाब | अनुदान रु. | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | नविन विहीर | २,५०,००० | १०० |

**लाभार्थी निवडीचे निकष** - या योजनेंतर्गत लाभार्थी निवडीसाठी अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीतील शेतक-यांकडे **नविन विहिरींसाठी किमान ०.४० हे.व कमाल ६.०० हे. आवश्यक आहे**.

**योजनेचा लाभ घेण्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्र :--**

१)ऑनलाईन अर्ज ((www.mahadbtmahait.gov.in),) गट विकास अधिकारी, पंचायत समिती मार्फत .
२) स्वतःचे नांवे, ७/१२ उतारा व ८ अ उतारा, ड-पत्रक (नगरपंचायत,नगरपालिका व महानगरपालीका क्षेत्रांबाहेरील)
३) म. तहसिलदार / प्रांत अधिकारी यांचा अनुसुचित जाती/ अनु.जमातीचा जातीचा दाखला (सत्यप्रत)
४) म.तहसिलदार यांचा मागिल वर्षाचा उत्पन्नाचा दाखला (रु.१,५०,०००/- मर्यादेत)
५) आधारकार्ड
६) आधारलिंक बँक खाते .
७) वैयक्तिक वन हक्क पटटेधारक असल्यास प्रथम प्राधान्य.
८) ७/१२ उतान्यावर इत्तर हक्कदार असतील तर त्यांचे  कार्यकारी दंडाधिकारी समक्षचे संमतीपत्र १००/- च्या स्टॅम्पवर
९) ) १ मे २००१ नंतर ३ रे अपत्य झालेले नसल्याबाबतचा ग्रामसेवकाने दिलेला दाखला.
१०) रेशनकार्ड झेरॉक्स
११) ग्रामसभा ठराव.

**सदरच्या योजनेंतर्गत अनुदान अदायगी म. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे मार्फत करण्यात येते.**